यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२
Ph.:0253-2231714, 15 Ext 2002 http://-ycmou.diqitaluniversity.ac
E-mail: mwkchair@ycmou.ac.in

**महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन**

---

**प्रेषक :** प्रा.विजयकुमार पाईकराव

**विषय :** मराठी भाषा गौरव दिन समारंभ-मराठी स्नेह शुभ संदेश भेट कार्ड प्रदर्शन उद्घाटन व माझी मराठीतील स्वाक्षरी उपक्रम इतिवृत्त अहवाल

**प्रति :** मा. कुलगुरू

**दिनांक :** ११/०३/२०२५

---


कृपया आपल्या कल्पक मार्गदर्शनातील अंतर्गत अधयनार्थी व ज्ञानगंगोत्री विद्यापीठ मुख्यालय सहकारीवृन्दासाठी महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन व जनसंपर्क कक्षाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन **“अनोखी कल्पक 'स्नेह शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन उद्घाटन व माझी मराठीतील स्वाक्षरी उपक्रम”** दि. २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.४५ वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये संपूर्ण दिवसभर आयोजन करण्यात आले होते.त्याचा इतिवृत्त अहवाल पुढीलप्रमाणे सविनय सादर.

**॥ इतिवृत्त अहवाल ॥**

मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रेसिंह बिसेन यांच्याप्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व शाखांचे मा. संचालक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, करारावरील तसेच दैनंदिन वेतनावरील कर्मचारी आणि इतर सर्व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. प्रारंभी संयोजक विजयकुमार पाईकराव मराठी भाषा गौरव दिन समारंभ-मराठी स्नेह शुभ संदेश भेट कार्ड प्रदर्शन उद्घाटन व माझी मराठीतील स्वाक्षरी उपक्रमाचा उद्देश आपल्या प्रास्ताविकात विशद केला. त्यानंतर डॉ. दयाराम पवार, डॉ. पूनम वाघ, डॉ. बाळासाहेब दिघे यांनी समोयोचीतशब्दात आपले विचार मांडले. यावेळी मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या सुभहस्ते प्रदर्शनाचे उदघाटन फीत सोडून व मराठी स्वाक्षरी करून करण्यात आले. या वेळी प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रेसिंह बिसेन यांनी आपले विचार व्यक्त केले. सर्वाना संबोधित करतांना मा. कुलगुरूंनी मराठी भाषेची सविस्तर थोरवी व्यक्त केली. या वेळी कुलसचिव डॉ. गोविंद कातलाकुटे, परीक्षा नियंत्रक बी.पी. पाटील, व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले आणि विविध विद्याशाखांचे संचालक, शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी, सहकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VCI/695
दि. 13/3/2026

१. या अनोख्या उपक्रमाचे मा. कुलगुरूंचे मान्यता पत्र :



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

**प्रेषक :** प्रा. विजयकुमार पाईकराव,
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

**विषय :** अनोखी कल्पक जाहिरात निर्मिती स्पर्धा व स्नेह शुभसंदेश भेटकार्ड स्पर्धा परीक्षण समितीबाबत.

**प्रति :** मा. कुलगुरू

**धारिका :** मवाकअ/२०२६
**दिनांक :** २५.०२.२०२६

**कृपया,**

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन वतीने आपल्या विद्यापीठाच्या सर्व अध्ययनार्थीसाठी **'अनोखी कल्पक जाहिरात निर्मिती स्पर्धा'** व **'स्नेह शुभसंदेश भेटकार्ड स्पर्धा'** आयोजित करण्यात आली होती. सदरील स्पर्धेतील स्पर्धकांनी पाठविलेल्या निवडक साहित्याचे प्रदर्शन सर्वांना माहिती व्हावे म्हणून. शैक्षणिक इमारतीच्या व्हरांड्यात (पोर्चमध्ये) दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी **मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रदर्शिनी** लावण्याचा मानस आहे. त्यास मान्यता द्यावी ही विनंती आदर व आभारासह.

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
प्रमुख,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

PRO


25/2/26

मा. कुलगुरू

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VCI/536
दि. 25/ 2 /2026.


२. या अनोख्या उपक्रमाचे प्रकाश क्षणचित्रे :




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने
मराठी भाषा गौरव दिन समारंभ निमित्त
'माझी मराठीतील स्वाक्षरी' उपक्रम


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने
मराठी भाषा गौरव दिन समारंभ
मराठी स्नेह शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन उद्घाटन व
'माझी मराठीतील स्वाक्षरी' उपक्रम
प्रा. संजीव सोनवणे
डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन
डॉ. गोविंद कतलाकुटे
Student Services Division

३. या अनोख्या उपक्रमाचे परिपत्रक पत्र :



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- 422 222

जा. क्र. : यचममुवि/जनसंपर्क/२०२६/४६६ दि. २६.०२.२०२६

**परिपत्रक**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने **मराठी भाषा गौरव दिन समारंभ-मराठी स्नेह शुभ संदेश भेट कार्ड प्रदर्शन उद्घाटन व माझी मराठीतील स्वाक्षरी उपक्रमाचे शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी- १०.४५ वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये आयोजन करण्यात आले आहे.**

कार्यक्रमाचे उद्घाटक विद्यापीठाचे मा. कुलगरू प्रा. संजीव सोनवणे आणि मा.प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदर कार्यक्रमास विद्यापीठाचे सर्व संचालक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, करारावरील सर्व कर्मचारी तसेच दैनंदिन वेतनावरील आणि इतर सर्व कर्मचारी यांनी सहभागी व्हावे.


**माझी मराठीतील स्वाक्षरी उपक्रमामध्ये सर्वोत्तम ११ स्वाक्षरीची निवड केली जाईल व स्वाक्षरीकर्त्यांना विशेष पारितोषिक देऊन सन्मानित केले जाईल.**

(डॉ. गोविंद कतलाकुटे)
कुलसचिव (प्र.)

प्रत माहितीस्तव-
मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रति : सर्व विद्याशाखा / विभाग / केंद्र संचालक / प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

४. या अनोख्या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांची स्वाक्षरी व अभिप्राय :



दि. २८ फेब्रुवारी २०२६
मराठी भाषा गौरवदिन समारंभ
मराठी स्नेह भेट शुभसंदेश कार्ड प्रदर्शन व
माझी मराठीतील स्वाक्षरी उपक्रम
के आपले अभिप्राय नाव आणि भ्रमणध्वनी लिहावा.

१. खूप छान उपक्रम


अतिशय छान व प्रेरणादायी उपक्रम. यामुळे इतरांनाही चालना मिळू शकेल

२. अप्रतिम असा उपक्रम, ह्यांनी सर्वांना प्रेरणा मिळेल.

३. अतिशय सुंदर उपक्रम नक्कीच असे उपक्रम राबविले असता सर्वांना प्रेरणा मिळेल.

४ अत्यंत उत्तम उपक्रम.

• स्वतःची स्वाक्षरी करता येईल इतपत शिका, आदहेशात खाली आपला विश्वास, वाचले आणि मराठी स्वाक्षरीचा प्रवास सुरू झाला.



मराठी भाषेची सेवा हीच खरी राष्ट्रसेवा आहे
शुद्ध लेखनानेच भाषेचे सौंदर्य अधिक खुलते...

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...'
या गीताचे बोल नेहमी
माझ्या मराठी भाषेच्या अभिमानाची
जाणीव करून देतो.
अत्यंत सुंदर उपक्रम..
धन्यवाद पाईकराव सर.

आपण मराठी असल्याचा अभिमान असावा तो वागण्यातून दिसावा.

छान उपक्रम.

ज्या माय मराठीने आम्हास सकल संत गाथारूपी ज्ञान दिले; भगवद्गीतेची भाष्य असलेली ज्ञानेश्वरी दिली, सकल संतांनी ग्रामगीतेतून मानवता शिकवली म्हणूनी लाभले आम्हास भाग्य शिकतो मराठी. या मराठी दिनाच्या आपल्या उपक्रमास शुभेच्छा

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या विचारांना वेगळ्या संदेश पत्राच्या माध्यमातून अतिशय समर्पक आदरांजली दिल्याबद्दल आयोजकांचे खूप खूप आभार।
९४०३३९५०९४.

म.... मायेचा
म.... मराठीचा
मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

9922999748

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी!

प्रो. नंदा लोखंडे

मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमातून पुन्हा एकदा शालेय जीवनातील दिवसांची आठवण आली. मराठी भाषा म्हणजे मनातील भाव-भावनांचे व प्रकटीकरणाचे एक महत्त्वपूर्ण साधन मी मानते.
आयोजकांचे मनापासून आभार.
धन्यवाद ...

विद्या आहेर.

अतिशय सुंदर उपक्रम
मराठी भाषेचा खूपच अभिमान आहे — वंदना फेगडे

* नागरिक बोरसे
अतिशय छान व प्रेरणादायी उपक्रम आहे
मराठी भाषेच्या गौरव दिना निमित्त शुभेच्छा.

* म --- महाराष्ट्राचा
म --- मुक्त शिक्षण प्रणालीचा
म --- मराठीचा
मराठी भाषा दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा ---
अतिशय उत्तम आणि छान उपक्रम.
आयोजकांचे धन्यवाद ...

शेखर जगताप.

विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम छान होते. त्यापैकी मराठी भाषेतील स्वाक्षरी करणे हे अतिशय नाविन्यपूर्ण उपक्रम वाटला.
प्रा. पाईकराव यांचे विशेष अभिनंदन.

अतिशय सुंदर उपक्रम!
मराठी भाषा दिनाचा अभिमान .. आणि
शुभेच्छा!

किशोर शिंदे, आरक्षण कक्ष.

मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी आणि समृद्ध करण्यासाठी असे उपक्रम वारंवार राबविणे आवश्यक आहे.
मराठी भाषा दिनाच्या सर्वांना शुभेच्छा...!

Deepali B. Jadhav

मराठी भाषा गौरव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! या दिनाबद्दल आयोजित उपक्रम छान आहे. असेच छान उपक्रम आपण आयोजित करत रहा!

मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्वप्रथम शुभेच्छा. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात हा उपक्रम अतिशय आगळ्या वेगळ्या प्रकारे साजरा करण्यात आला. आयोजकांचे स्वागत..
हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात मा. कुलगुरू सरांचे खूप मोठे योगदान आहे. असेच उपक्रम विद्यापीठात यापुढेही होतील यात शंका नाही. पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

आज मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.
या दिवशी मी माझ्या पुनर्नोंदणी दाखल्यासाठी येथे आल्यामुळे मला हि मराठी लिपी सही करण्याची संधी तुमच्या उपक्रमामुळे मिळाली. मी तुमचे आभार व्यक्त करतो.

## ५. या अनोख्या उपक्रमाचे प्रसिद्धी पत्रे :

**नवराष्ट्र** YCMOU PRO

Nashik | 02 March 2026 | Page 2

# 'मुक्त'मध्ये 'माझी मराठीतील स्वाक्षरी'



▶ नाशिक (प्र.) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'मराठी भाषा गौरव दिन' निमित्त 'माझी मराठीतील स्वाक्षरी' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच 'मराठी स्नेह शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन' भरविण्यात आले. विद्यापीठाचा जनसंपर्क कक्ष आणि महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शन - उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी फीत उलगडून व मराठीत स्वाक्षरी करून केले.

यावेळी बोलतांना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, मराठी भाषेचे विज्ञान आधी समजून घेऊन मग त्या भाषेचा व्यवहारात उपयोग कसा करायचा हे ठरवले पाहिजे. मराठी भाषा ही अतिशय लवचिक, वेळप्रसंग व संदर्भानुसार शब्दांचा अर्थ बदलत असल्याने शब्दांचा नेमका व यथोचित वापर करता आला पाहिजे. मराठी भाषिक असूनही रोज एक नवीन मराठी शब्द शिकला पाहिजे, आत्मसात केला पाहिजे. त्यासाठी सातत्याने दर्जेदार मराठी वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी माता, मातृभूमी व मातृभाषा यांचे आपल्यावरील उपकार अनंत व फेडता येणार नाही असे असतात. त्याची जाणीव ठेवून सर्वांनी आचरण करावे व मराठी भाषेचा वारसा जपावा असे आवाहन त्यांनी केले. डॉ. दयाराम पवार, डॉ. पूनम वाघ व डॉ. बाळासाहेब दिघे यांनी मनोगत व्यक्त केले.

---

**नवभारत** YCMOU PRO

Nashik | 01 March 2026 | Page 2

**उद्घाटन :** छात्रों ने ग्रीटिंग कार्ड से दी भाषा को सलामी

# मराठी में साइन से 'हस्ताक्षर अभियान'

■ नाशिक, (सं.) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विश्वविद्यालय में 'मराठी भाषा गौरव दिवस' के उपलक्ष्य में 'माझी मराठीतील स्वाक्षरी' (मराठी में मेरा हस्ताक्षर) नामक अभिनव उपक्रम का आयोजन किया गया. इसके साथ ही 'मराठी स्नेह-शुभकामना ग्रीटिंग कार्ड प्रदर्शनी' भी लगाई गई. विश्वविद्यालय के जनसंपर्क कक्ष और महाकवि वामनदादा कर्डक अध्यास के संयुक्त तत्वावधान में आयोजित इस कार्यक्रम का उद्घाटन कुलपति प्रो. संजीव सोनवणे ने फीता काटकर और स्वयं मराठी में हस्ताक्षर करके किया.

**भाषा के विज्ञान को समझना जरूरी**

इस अवसर पर कुलपति प्रो. संजीव सोनवणे ने कहा कि मराठी भाषा अत्यंत लचीली और समृद्ध है, जिसमें समय और संदर्भ के अनुसार शब्दों के अर्थ बदल जाते हैं. उन्होंने जोर दिया कि हमें पहले भाषा के विज्ञान को समझना चाहिए और फिर व्यवहार में उसका यथोचित उपयोग करना चाहिए. कुलपति ने उपस्थित लोगों से आह्वान किया कि मराठी भाषी होने के बावजूद, हमें प्रतिदिन एक नया मराठी शब्द सीखना और उसे आत्मसात करना चाहिए. इसके लिए निरंतर उत्कृष्ट मराठी साहित्य का वाचन अनिवार्य है.



**मातृभाषा का ऋण सर्वोपरि**

कार्यक्रम के प्रमुख अतिथि प्र-कुलपति डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन ने अपने संबोधन में कहा कि माता, मातृभूमि और मातृभाषा के उपकार अनंत होते है, जिन्हें कभी चुकाया नहीं जा सकता.

**प्रशासनिक उपस्थिति**

इस अवसर पर प्रबंधन बोर्ड की सदस्य प्रा. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटिल सहित विभिन्न विभागों के निदेशक, प्रोफेसर और कर्मचारी उपस्थित थे. कार्यक्रम का संचालन प्रो. विजयकुमार पाईकराव ने किया और आभार प्रदर्शन राजेश बर्वे ने किया. आयोजन को सफल बनाने में जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे, सचिन तरवटे, प्रतिभा काशीद और नितिन जोंधले ने विशेष परिश्रम किया.

---

YCMOU PRO PD 03.03.2026

**पुढारी**

# मुक्त विद्यापीठात 'माझी मराठीतील स्वाक्षरी'

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'माझी मराठीतील स्वाक्षरी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू संजीव सोनवणे यांनी उपक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी कुलगुरू सोनवणे म्हणाले की, मराठी भाषेचे विज्ञान आधी समजून घेत त्या भाषेचा उपयोग व्यवहारात कसा करायचा हे ठरवले पाहिजे. मराठी भाषा ही लवचिक, वेळप्रसंग व संदर्भानुसार शब्दांचा अर्थ बदलत असल्याने शब्दांचा नेमका व यथोचित वापर करता आला पाहिजे. दर्जेदार मराठी वाचन करावे असे आवाहन केले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, डॉ. दयाराम पवार, डॉ. पूनम वाघ व डॉ. बाळासाहेब दिघे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, भटूप्रसाद पाटील उपस्थित होते. प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी सूत्रसंचालन केले, तर जनसंपर्क राजेश बर्वे यांनी आभार मानले.

---

YCMOU PRO

# मुक्त विद्यापीठात मराठी भाषा दिन साजरा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'माझी मराठीतील स्वाक्षरी' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच 'मराठी स्नेह शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन' भरविण्यात आले. विद्यापीठाचा जनसंपर्क कक्ष आणि महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी केले. यावेळी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले, मराठी भाषेचे विज्ञान आधी समजून घेवून मग त्या भाषेचा व्यवहारात उपयोग कसा करायचा हे ठरवले पाहिजे. मराठी भाषा ही अतिशय लवचिक, वेळप्रसंग व संदर्भानुसार शब्दांचा अर्थ बदलत असल्याने शब्दांचा नेमका व यथोचित वापर करता आला पाहिजे. मराठी भाषिक असूनही रोज एक नवीन मराठी शब्द शिकला पाहिजे, आत्मसात केला पाहिजे. त्यासाठी सातत्याने दर्जेदार मराठी वाचन करावे असे आवाहन त्यांनी केले. यानंतर प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, डॉ. दयाराम पवार, डॉ. पुनम वाघ व डॉ. बाळासाहेब दिघे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी व्यवस्थापन मंडळ सदस्या प्रा. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, भटूप्रसाद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे, सचिन तरवटे, प्रतिभा काशीद व नितीन जोंधळे यांनी परिश्रम घेतले.

Nashik Edition

Mar 02, 2026 Page No. 04

# भ्रमर

YCMOU PRO BHRMR P3 07.03.26

## मुक्त विद्यापीठात ‘माझी मराठीतील स्वाक्षरी’ उपक्रम



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :– यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ‘माझी मराठीतील स्वाक्षरी’ या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच ‘मराठी स्नेह शुभसंदेश भेटकार्ड प्रदर्शन’ भरविण्यात आले होते.

विद्यापीठाचा जनसंपर्क कक्ष आणि महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शन उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी फीत उलगडून व मराठीत स्वाक्षरी करून केले.

यावेळी बोलताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, मराठी भाषेचे विज्ञान आधी समजून घेऊन मग त्या भाषेचा व्यवहारात उपयोग कसा करायचा हे ठरवले पाहिजे. मराठी भाषा ही लवचिक, वेळप्रसंग व संदर्भानुसार शब्दांचा अर्थ बदलत असल्याने शब्दांचा नेमका व यथोचित वापर करता आला पाहिजे. मराठी भाषिक असूनही रोज एक नवीन मराठी शब्द शिकला पाहिजे, आत्मसात केला पाहिजे. त्यासाठी सातत्याने दर्जेदार मराठी वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी माता, मातृभूमी व मातृभाषा यांचे आपल्यावरील उपकार अनंत व फेडता येणार नाही, असे असून त्याची जाणीव ठेवून सर्वांनी आचरण करावे व मराठी भाषेचा वारसा जपावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. दयाराम पवार, डॉ. पूनम वाघ व डॉ. बाळासाहेब दिघे यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी व्यवस्थापन मंडळ सदस्या प्रा. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांच्यासह विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, सुरक्षा कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. जनसंपर्क कक्षाचे सहाय्यक राजेश बर्वे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे, सचिन तरवटे, प्रतिभा काशीद व नितीन जोंधळे यांनी परिश्रम घेतले.

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

मा. कुलगुरू